**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सभापतींविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान  अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात घेण्यात येणार

- सेंट्रल बँक डिजीटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- महाशिवरात्रीनिमित्त राज्यातल्या शिवमंदिरांमधे अलोट गर्दी

- मराठी पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची मराठी भाषा मंत्र्यांची घोषणा

**आणि**

- दहशतवादविरोधी पथकाचे यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापे

**<><><><><>**

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर ९ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेतली जाईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनी वृत्तसंस्थेला दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चला सुरु होईल, या टप्प्यात काही विधेयकं चर्चेला येतील, यात एक महत्त्वाचं विधेयक आहे, असं त्यांनी सांगितलं. पहिल्याच दिवशी ९ मार्चला सभापतीं विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर मतदान होईल, असं रिजिजु म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज गुजरातमधे गांधीनगर इथं CBDC अर्थात केंद्रिय बँक डिजिटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं उद्घाटन केलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयातला भ्रष्टाचार यामुळे संपुष्टात येईल असा

विश्वास यावेळी शहा यांनी व्यक्त केला. तसंच गरीबांना अन्न पोहोचणं सुलभ होईल, असं शहा म्हणाले.

**होल्ड बाईट शहा**

यापूर्वी नक्षलग्रस्त किंवा संघर्षग्रस्त भागात पाच किलो अन्नही गरिबापर्यंत पोहचत नसे, मात्र आज या प्रणालीचं डिजिटायजेशन झाल्यामुळे अन्न पोहोचणं सोपं झाल्याचं शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हटलं आहे. या क्रमवारीत तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर असून गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय साधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यं आत्मसात करता यावीत यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची नेमणूक करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२२ मधे मार्गदर्शक तत्वं जारी केली होती. ही नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असेल असंही यात सांगितलं होतं. त्यानुसार देशभारत अशा एक हजार ८४१ नेमणुका झाल्या असून यातल्या तमिळनाडूत ३४५, महाराष्ट्रात १९३, गुजरातमधे १७९ आणि कर्नाटकमधे १७० नेमणुका झाल्या आहेत.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नैतिक, सर्वसमावेशक आणि जबाबदारीने व्हावा यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय इंटेल इंडियासोबत मिळून उद्यापासून देशभरात मोहिम राबवणार आहे. विश्वासार्ह आणि मानव केंद्रित एआय परिसंस्था तयार करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे, असं मंत्रालयाने म्हटलं आहे. यावेळी लोकांना एआयचा जबाबदार वापर करण्याबद्दल प्रतिज्ञा देण्यात येईल, त्याआधी त्यांच्याकडून एक प्रश्नावली भरून घेतली जाईल, असंही सांगण्यात आलं आहे. उद्यापासून नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटला सुरुवात होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर या मोहिमेद्वारे नागरिकांशी संवाद साधला जात आहे.

**<><><><><>**

अहमदाबाद इथं गेल्या वर्षी झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघाताबाबत परदेशी माध्यमांनी केलेलं दाव्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी खंडन केलं आहे. अपघाताचा तपास अद्याप सुरू असल्याची माहिती मोहोळ यांनी सांगली इथं बातमीदारांशी बोलताना दिली.

या विमान अपघाताची चौकशी करणाऱ्या संस्थेनं अपघातासाठी वैमानिकांना दोषी ठरवल्याचा दावा इटलीतल्या एका दैनिकानं केला होता. मात्र, अद्याप तपाससंस्थांनी तपास पूर्ण करून आपला अहवाल सादर केलेला नसून बाहेरच्या कुठल्याही संस्थांवर विश्वास ठेवू नये, असं मोहोळ म्हणाले. गेल्या वर्षी १२ जून रोजी लंडनच्या दिशेनं जाणारं एअर इंडियाचं विमान अहमदाबाद इथं उड्डाणानंतर लगेच कोसळलं होतं. त्यात विमानातल्या २४१ प्रवाशांसह २६० जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

महाशिवरात्रीचा उत्सव आज सर्वत्र भक्तीभावाने साजरा होत आहे. देशातल्या बारा ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणांसह प्रमुख पुरातन शिव मंदीरात पहाटेपासूनच रुद्राभिषेक-महापूजा करण्यात येत असून भाविक मोठ्या संख्येनं दर्शनासाठी गर्दी करत आहेत. राज्यात परळी-वैजनाथ, औंढा-नागनाथ, वेरुळच्या घृष्णेश्वर, तसंच नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांच्या स्थानांवर दर्शनासाठी देशोदेशीहून आलेल्या भाविकांची गर्दी झाली आहे. याखेरीज इतर शंकरमंदिरांमधे महाशिवरात्र साजरी होत असल्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत. मुंबईच्या बाबुलनाथ मंदिरात नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी महापूजा केली. ठाण्याच्या कौपिनेश्वर देवालयात, गोंदिया जवळ अडीचशे वर्षांहून जास्त प्राचीन अशा नागराधाम पंचमुखी शिव लिंग मंदिरात, छत्रपती संभाजीनगर शहरातल्या खडकेश्वरच्या महादेव मंदीरातही भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सिडको एन-वन परिसरातल्या नर्मदेश्वर मंदिरात आज संध्याकाळी भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

लातूर शहराचं ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवस्थानची महाशिवरात्री निमित्त यात्रा आजपासून सुरु झाली.

देशभरात ठिकठिकाणी महादेव मंदिरांमधे शासकीय पूजा आणि अभिषेकही करण्यात येत आहे. चारधामपैकी बाबा केदरनाथ मंदिराचे दरवाजे येत्या २२ एप्रिलला उघडण्यात येणार असल्याची घोषणा आज महाशिवरात्रीच्या दिवशी करण्यात आली.

राज्यात गावोगावी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा भरल्या आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांनी महाशिवरात्री निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

मराठी भाषेतली पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीत केली. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या सत्कार सोहळ्यात काल ते बोलत होते. परदेशातल्या मराठी नागरिकांच्या पुढच्या पिढीसाठी मराठी शिकवणारा ऑनलाईन कोर्स, कवी केशवसुत स्मारकाचं अत्याधुनिकीकरण अशा घोषणाही सामंत यांनी केल्या. याविषयीचा सविस्तर वृत्तांत ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… व्हॉईस कास्ट - अनिकेत कोनकर**

**<><><><><>**

थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचं आराध्य दैवत, श्री संत सेवालाल महाराज यांची आज जयंती. राज्यभरात यानिमित्त विविध धार्मिक-सांस्कृतीक कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई इथं त्यांच्या शासकीय निवासस्थानी सकाळी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

वाशीमच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय-महाविद्यालयाचं नामकरण आता संत सेवालाल महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम असं करण्यात आलं आहे. राज्य शासनानं याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी केला. शंभर विद्यार्थी क्षमतेसह संलग्न असं ४३० खाटांचं रुग्णालय सुरू करण्यासाठी याआधीच मान्यता मिळालेली आहे.

नवी दिल्लीत महाराष्ट्र परिचय केंद्रातही संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

दहशतवादाशी संबंधित कारवायांप्रकरणी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली आणि काही संशयितांना ताब्यात घेतलं. यवतमाळमधल्या पुसद आणि उमरखेड इथल्या १४ ठिकाणी शोधमोहिमा सुरू आहेत. त्यात आक्षेपार्ह कागदपत्रं, मोबाईल फोन आणि विद्युत उपकरणं जप्त केल्याची, तसंच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. संशयितांची चौकशी सुरू असून आत्तापर्यंत कोणालाही अटक केलेली नाही. अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ठिकाणी दहशतवादविरोधी पथकानं छापे टाकले आणि आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या. ही कारवाई अद्याप सुरू आहे.

**<><><><><>**

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारत-पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत कोलंबो इथं रंगणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीतल्या यशापयशावर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

**//<><><><><>//**